# <u>महत्वाची सूचना</u>

मवैआसे गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिका-यांच्या रिक्त असलेल्या एकुण ८७७ पदभरतीच्या अनुषंगाने शासन पत्र क्रमांक मवैअ-२०१९/ प्र.क्र.४०८/ सेवा-३, दिनांक १९ जुलै २०१९ व दि. २२ जुलै २०१९ अन्वये समुपदेशन प्रक्रिया आरोग्य भवन, आरोग्य सेवा संचालनालय, सेंट जॉर्जेस रुग्णालय, आवार, मुंबई -४००००१ येथील तळमजल्यावरील सभागृहात दिनांक २३ जूलै २०१९ पासून सकाळी ०९ .०० वाजता पासून सुरु करण्यात आली आहे.

गुणवत्ता यादी क्रमांक १ मधील पदव्युत्तर पदवी/ पदविका धारक व गुणवत्ता यादी क्र.२ मधील उर्वरीत पदव्युत्तर पदवी/ पदविका धारक व एम.बी.बी.एस. अर्हताधारक उमेदवारांची यादी आरोग्य सेवा संचालनालयाचे **Website : http:// arogya.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. जे उमेदवार दि. २३ ते २६ जुलै २०१९ या कालावधीत समुपदेशनासाठी उपस्थित राहु शकले नाहीत, त्यांना दिनांक २९ व ३०/०७/२०१९ रोजी उपस्थित राहण्याची संधी देण्यात येत असून, अशा उमेदवारांना समुपदेशनाने पदस्थापना देण्याचे शासनाने ठरविले आहे. तरी उमेदवारांनी स्वतः मुळ कागदपत्रांसह समक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच जाहिरातीतील अटी व शर्ती आणि सदर संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

(स्वाक्षरी)

**( डॉ. अनुप कुमार यादव)**

**आयुक्त आरोग्य सेवा, मुंबई**